**विकास योजना - पिंपरी-चिंचवड महानगरपालिका (वाढीव हद्द)**

मौ. ताथवडे स.नं.४१/४ येथील आरक्षण क्र.२७ "रिटेल मार्केट व पार्कीग" या आरक्षणाखालील एकूण क्षेत्र १ हे. १४ आर पैकी ७६८४.० चौ.मी. क्षेत्र निवासी विभागात समाविष्ट करणेबाबत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ अन्वये मंजुरीची अधिसूचना.

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**चौथा मजला, मुख्य इमारत, मंत्रालय,**
**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई - ४०० ०३२.**
**शासन निर्णय क्रमांक- टिपीएस-१८२२/६९९/प्र.क्र.१८१/२०२२/नवि-१३**
**दिनांक : १६.०१.२०२५**

**शासन निर्णय** : सोबतची शासकीय अधिसूचना महाराष्ट्र शासन राजपत्राच्या पुणे विभागीय पुरवणी भाग एक मध्ये प्रसिध्द करावी.

*महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,*

URBAN DEVELOPMENT DEPTT. सत्यमेव जयते MANTRALAYA MUMBAI-32

**(प्रणव कर्पे)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत :-**

१) मा. मुख्यमंत्री महोदय यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) मा. उपमुख्यमंत्री (नगर विकास) महोदय यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. उपमुख्यमंत्री (वित्त) महोदय यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
५) मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
६) मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा / विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
७) मा. राज्यमंत्री (नगर विकास) महोदया यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
८) अपर मुख्य सचिव (नवि-१), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
९) संचालक (नगर रचना) तथा सह सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

**प्रति :-**

१) संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे.
/- सदर अधिसूचना नगर रचना संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.
२) सहसंचालक, नगर रचना, पुणे विभाग, पुणे.
३) विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे.
४) आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी.
/- प्रस्तुत अधिसूचनेच्या अनुषंगाने अधिप्रमाणित करावयाचे विकास योजना भाग नकाशे ५ प्रतीत शासनास विहित मार्गाने सादर करावेत.

५) सहायक संचालक, नगर रचना, पुणे शाखा, पुणे.

६) व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय, येरवडा कारागृह, पुणे.

/- सोबतची शासकीय अधिसूचना महाराष्ट्र शासन राजपत्राच्या पुणे विभागीय पुरवणीमध्ये प्रसिध्द करुन त्याच्या प्रत्येकी १० प्रती या विभागास व उपरोक्त कार्यालय यांना पाठवाव्यात.

७) कक्ष अधिकारी (नवि-२९), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

/- सदर अधिसूचना या विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.

८) कक्ष अधिकारी, माहिती व तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई.

/- सदर अधिसूचना शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी.

९) निवड नस्ती, कार्यासन (नवि-१३).

**********

URBAN DEVELOPMENT DEPTT. ★ MANTRALAYA, MUMBAI-32 ★ सत्यमेव जयते

**अधिसूचना**
**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**चौथा मजला, मुख्य इमारत, मंत्रालय,**
**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई - ४०० ०३२.**
**दिनांक : १६.०१.२०२५**

*महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६*

**क्रमांक-टिपीएस-१८२२/६९९/प्र.क्र.१८१/२०२२/नवि-१३ :-** ज्याअर्थी, शासन नगर विकास विभागाने, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (१९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.३७) (यापुढे 'उक्त अधिनियम' असे उल्लेखिलेला) चे कलम-३१(१) अन्वये, पिंपरी चिंचवड (वा.ह.) महानगरपालिकेची (यापुढे 'उक्त नियोजन प्राधिकरण' असे उल्लेखिलेला) विकास योजना अधिसूचना क्र.टिपीएस-१८१५/२०१२/प्र.क्र.८४/१५/वि.यो.मंजूरी/नवि-१३, दि.०६.०१.२०१७ अन्वये मंजूर झाली आहे तसेच वगळलेल्या भागाची विकास योजना शासन अधिसूचना क्र.टिपीएस-१८१५/२०१२/प्र.क्र.८४/१५/ई.पी.मंजूरी/नवि-१३, दि.०३.१०.२०१८ नुसार मंजूर झालेली आहे (यापुढे "उक्त विकास योजना" आणि "उक्त अधिसूचना" म्हणून उल्लेखिलेल्या);

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजनेतील नियोजनानुसार, मौ. ताथवडे मधील स.नं. ४१/४ (यापुढे "उक्त जमीनी" असे संबोधिले आहे) येथे आरक्षण क्र.२७ "रिटेल मार्केट व पार्कींग" एकूण क्षेत्र १ हे. १४ आर (यापुढे "उक्त आरक्षण" असे संबोधिले आहे) प्रस्तावित असून उक्त आरक्षणाकरीता पिंपरी चिंचवड महानगर पालिका नियोजन प्राधिकरण (यापुढे "उक्त नियोजन प्राधिकरण" असे संबोधिले) आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त नियोजन प्राधिकरणाने त्यांच्या सर्वसाधारण सभेचा ठराव क्र.६५९, दि.२९.०७.२०२१, अन्वये, उक्त विकास योजनेत फेरबदल करुन, उक्त जागेवरील रिटेल मार्केट व पार्कींग या आरक्षणाखालील एकूण क्षेत्र १ हे. १४ आर जागेपैकी ७६८४.० चौ.मी. क्षेत्र रहिवास विभागामध्ये समाविष्ट करण्याचे ठरवून उक्त अधिनियमाचे कलम ३७(१) अन्वये सर्व वैधानिक कार्यवाही पूर्ण करुन फेरबदल प्रस्ताव शासनाच्या मान्यतेसाठी सादर केला आहे. (यापुढे "उक्त फेरबदल प्रस्ताव" असे संबोधिले आहे.);

आणि ज्याअर्थी, शासनाने आवश्यक ती चौकशी केल्यानंतर व संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेशी सल्लामसलत केल्यानंतर उक्त फेरबदलाचा प्रस्ताव मंजूर करणे योग्य होईल, असे शासनाचे मत झाले आहे;

आणि ज्याअर्थी, आता उक्त जागेखालील, मौ. ताथवडे मधील स.नं. ४१/४ या जमिनीच्या मालकांनी बाजारमूल्य दर तक्त्यानुसार येणाऱ्या उक्त जमिनीच्या एकुण रकमेच्या ५% दराने येणा-या अधिमूल्य रक्कमेपैकी शासनास देय असलेली अधिमुल्याची ५०% रक्कम सहायक संचालक, नगर रचना, पुणे शाखा, पुणे यांच्या लेखाशिर्षामध्ये जमा केलेली आहे आणि नियोजन प्राधिकरणास देय असलेली ५०% अधिमूल्याची रक्कम आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी यांच्या लेखाशिर्षामध्ये जमा केलेली आहे;

आता त्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम ३७ पोटकलम (२) अन्वये व त्या अनुषंगाने प्राप्त असलेल्या इतर अधिकारांचा वापर करुन उक्त विकास योजनेतील उक्त फेरबदल प्रस्तावास शासन मंजूरी देत आहे. उक्त विकास योजना मंजूरीच्या अधिसूचनांच्या फेरबदल सुचीतील शेवटच्या नोंदीनंतर पुढील नव्या नोंदीचा समावेश करण्यात येत आहे.

"नोंद"

"मौ. ताथवडे स.नं. ४१/४ येथील आरक्षण क्र.२७ "रिटेल मार्केट व पार्कींग" आरक्षणामधील एकुण क्षेत्र १ हे. १४ आर. पैकी ७६८४.० चौ.मी. क्षेत्र वगळून रहिवास विभागात समाविष्ट करण्यात येत आहे."

URBAN DEVELOPMENT DEPTT. सत्यमेव जयते MANTRALAYA, MUMBAI-32

१) सदर फेरबदल दर्शविणारा भाग नकाशा क्र. टिपीएस-१८२२/६९९/प्र.क्र.१८१/२०२२/नवि-१३ जनतेच्या अवलोकनार्थ आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, जि. पुणे यांच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत एक महिन्याच्या कालावधीसाठी उपलब्ध असेल.

२) सदर अधिसूचना शासनाच्या www.maharashtra.gov.in (कायदे/नियम) या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येत आहे.

*महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,*

(प्रणव कर्पे)
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**NOTIFICATION**
**GOVERNMENT OF MAHARASHTRA**
**Urban Development Department**
**Madam Kama Marg, Hutatma Rajguru Chowk,**
**Mantralaya, Mumbai – 400 032.**
**Dated - 16.01.2025.**

*The Maharashtra Regional and Town Planning Act, 1966*

**No.TPS-1822/699/C.R.181/2022//UD-13:-** Whereas, the Government in Urban Development Department, under section 31(1) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (Maharashtra Act No.XXXVII of 1966) (hereinafter referred to as "the said Act") has sanctioned Development Plan of Pimpri Chinchwad Municipal Corporation vide Notification No.TPS-1815/2012/CR-84/15/D.P. Sanction/UD-13, dt.06.01.2017 and sanctioned the Development Plan of Excluded Parts vide Notification No.TPS-1815/2012/CR-84/15/E.P. sanction/UD-13, dated 03.10.2018. (hereinafter referred to as "the said Development Plans" and "the said Notifications");

And whereas, as per the said Development Plan, in Survey No. 41/4 of Village Tathawade (hereinafter referred to as "the said land"), Reservation No.27 "Retail Market and Parking" having area 1 Hectare 14 Are (hereinafter referred to as "the said reservation") is proposed. The Pimpri Chinchwad Municipal Corporation is the Planning Authority (hereinafter referred to as "the said Planning Authority") for the said reservation;

And whereas, the said Planning Authority, through Resolution No. 659 dated 29.07.2021 of its General Body Meeting, decided to modify the said Development Plan to delete an area of 7,684.0 square meters out of the total area of 1 hectare 14 ares reserved for "Retail Market and Parking" and to include it into the Residential Zone. And after completing all statutory procedures under Section 37(1) of the said Act the modification proposal has been submitted for the approval of the Government (hereinafter referred to as the "said Modification Proposal").

And whereas, after making necessary enquiries and consulting the Director of Town Planning, Maharashtra State, Pune, the Government is of opinion that, the proposed Modification needs to be sanctioned;

And whereas, the landowners of the said land at Survey No. 41/4, Mauje Tathawade, have deposited 50% of the premium amount payable to the Government, calculated at 5% of the total market value of the said land as per the ASR, into the account of the Assistant Director, Town Planning, Pune Branch, Pune, and have also deposited the remaining 50% of the premium amount payable to the Planning Authority into the account of the Commissioner, Pimpri-Chinchwad Municipal Corporation, Pimpri;

Now therefore, in accordance with Subsection (2) of Section 37 of the said Act and by exercising the associated powers conferred therein, the Government hereby approves the proposed modification in the said Development Plan. A new entry is being added after the last entry in the list of modifications to the notification sanctioning the said Development Plan.

**ENTRY**

"An area of 7684.0 square meters is being excluded from the total reserved area of 1 hectare 14 ares designated for Reservation No.27 'Retail Market and Parking' at Survey No. 41/4, Mauje Tathawade, and is being included in the residential zone."

1. A copy of the part plan No.TPS-1822/699/CR-181/2022/UD-13 showing the aforesaid sanctioned modification shall be available in the office of the Commissioner, Pimpri-Chinchwad Municipal Corporation, Pimpri during office hours on all working days for inspection of public for a period of one month.

URBAN DEVELOPMENT DEPTT. MANTRALAYA, MUMBAI-32 सत्यमेव जयते

2. This Notification shall also be published on the Govt. website www.maharashtra.gov.in (Acts & Rules.)

*By order and in the name of the Governor of Maharashtra,*

**(Pranav Karpe)**
**Under Secretary to Government**